नेमणूक मान्यता आदेश

जा.क्र./जिपजा/शिक्षण/प्रा-६/९३/......
कार्यालय जिल्हा परिषद जालना
दिनांक -: २५/११/१९९३.

प्रति,
मुख्याध्यापक,

विषय -: कर्मचारी नेमणूकीस मान्यता देण्या बाबत.

संदर्भ -: आपला प्रस्ताव क्र.

आपल्या उपरोक्त संदर्भिय प्रस्तावास अनुसरुन शाळेच्या आवश्यकते प्रमाणे. संस्थेने नेमलेल्या कर्मचा-यांना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमाच्या व खाली दर्शविलेल्या अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१] आपल्या शाळेतील सर्व वर्ग तुकड्या मान्यता व अनुदान प्राप्त असून त्यासाठी- आवश्यक कर्मचा-यांच्या संख्येस शिक्षणाधिकारी प्राथ यांची मान्यता दिली आहे. त्यापेक्षा जादा नेमलेल्या कर्मचा-यांच्या वेतनाची जबाबदारी शाळेवर /संस्थेवर राहील.

२] कर्मचारी अनुसूचित मंजूरी आदेशात विहीत केलेले प्रशिक्षीत प्रमाण राखण्यात आलेले आहे.

३] शाळेतील शिक्षक कर्मचारी व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी विहीत टाइपाबी केलेल्या तासिकाप्रमाणे पूर्णवेळ सेवा करीत आहेत.

४] महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी [ सेवेच्या शर्ती नियम १९८१ च्या नियम क्र.७ अन्वये आवश्यक ते मागासवर्गीयांचे प्रमाण राखलेले असून मागासवर्गीय कर्मचारीच्या नेमणूका करण्या बाबतची कार्यवाही नियम क्र. ८ व ९ अन्वये पूर्ण करण्यात आलेली आहे.

५] व्यवस्थापनाने केलेल्या नेमणूका या महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी [ सेवेच्या शर्ती नियम १९८१ च्या अनूसूची "ब" मध्ये दिलेल्या शैक्षणिक अर्हता व अनूसूची "क" मध्ये दिलेल्या वेतन श्रेणी नूसारच उपलब्ध पदांच्या अधीन राहून - करण्यात आलेल्या आहेत.

६] या कार्यालयाकडून अतिरीक्त शिक्षक आपणाकडे समावून घेण्यासाठी पाठविल्यास व त्या नूसारचे अतिरीक्त म्हणून नेमले गेल्यास नेमणूक दिलेल्या शिक्षकास २४ तासा ची नोटीस देऊन कमी करण्यात येईल अशी लेखी समज त्यांना देण्यात यावी व समज मिळाले बद्दलची त्यांची स्वाक्षरी आपल्या दप्तरी ठेवावी.

७] १९९३-९४ वर्षात जादा मिळालेल्या तुकड्यांसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मान्यता मिळालेली असली तरी जिल्हा नियोजन व विकास मंडळाने आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिल्यासच वेतन अदा केले जाईल सदरील जादा तुकड्यां अनुदान तत्वावर आल्याचे आदेश मिळाल्यानंतरच कर्मचा-यांची देयके .... सादर करावीत. क्र. पा. २५६।